# सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा

# संगणक दुरुस्ती (मेन्टेंनन्स) करारनामा

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2019 ◑ VK 541592

फक्त प्रतिज्ञापत्रासाठी (अनुच्छेद ४) Only For Affidavit (Article 4)

प्रतिज्ञापत्र कोणाकडे सादर करावयाचे / (For Submiting to)

प्रतिज्ञापत्रासाठी कारण / (Reason for Affidavit)

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव व राहीवाशी पत्ता / Stamp Purchaser's Name & Place of Residence) सुभाष गणेश कुंभार

मुद्रांक विक्री नोंद वही अनु. क्रमांक दिनांक / Serial No./Date ५ / २०१९ 12811/ 24/8/2019

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही (Stamp Purchaser's Sign/Date)

परवानाधारक मुद्रांक विक्रेत्याची सही व परवाना क्रमांक / मुद्रांक विक्रीचे ठिकाण / पत्ता

भास्कर रामचंद्र जाधव
परवाना क्र. २३०१००१
... फ्लॅट -७५, रामाचा गोट, सातारा

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्या पासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

TREASURY OFFICE SATARA
20 AUG 2019
STAMP HEAD CLERK

रयत शिक्षण संस्थेचे

सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.

संगणक व संगणक साहित्य दुरुस्ती देखभाल करारनामा (Maintenance Contract)

सन २०१९ - २०२०

---

## - करारनामा -

SAVITRIBAI PHULE MAHILA MAHAVIDYALAYA SATARA

Dr. K.B.P. Institute of Information Technology Estd.1998 Satara

सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.

(एस पी एम एम एस एस)

तर्फे

लिहून घेणार

प्रि. डॉ. आंधळे ए. डी.

प्राचार्य,

सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.

डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिटयूट ऑफइन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, सातारा

(के.आय.आय.टी.)

तर्फे

लिहून देणार

श्री सूर्यकांत पोरे

समन्वयक,

के.आय.आय.टी, सातारा

करारनामा लिहून देतो की,

रयत शिक्षण संस्थेच्या सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा. या महाविद्यालयामधील सर्व विभागातील सर्व प्रकारच्या संगणक व संगणक साहित्य दुरुस्तीसाठी (AMC) पुढील प्रमाणे नियम, अटी व शर्ती ठरविण्यात आल्या आहेत त्या सर्व नियम, अटी व शर्ती सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा. व डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, सातारा (के.आय.आय.टी) यांना मान्य आहेत.

**करारातील संज्ञा -**

१) सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारासाठी- **(एस पी एम एम एस)**

२) डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, सातारासाठी **(के.आय.आय.टी.)**

येथून पुढे करारामध्ये (Agreement) या संज्ञा वापरण्यात येतील.

**करारामधील नियम, अटी व शर्ती . . .**

१. एस पी एम एम एस मधील संगणक व संगणक साहित्य दुरुस्ती (AMC) साठी के. आय. आय. टी, हे एस पी एम एम एस यांना रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करार लिहून देत आहेत.

२. संगणक व संगणक साहित्य दुरुस्तीसाठी कोणत्याही प्रकारची ॲडव्हान्स रक्कम एस पी एम एम एस यांच्याकडून के.आय.आय.टी. यांना दिली जाणार नाही.
३. के.आय.आय.टी.च्या संपर्कासाठीची माहिती, संपर्क व्यक्तीचे नाव, ई-मेल, मोबाईल नंबर, टेलिफोन नंबर इत्यादी माहिती एस पी एम एम एस यांना द्यावी लागेल.
४. एस पी एम एम एस मधील नादुरुस्त संगणक व संगणक साहित्य यांची दुरुस्ती संदर्भातील माहिती के.आय.आय.टी. यांच्या कॉल सेंटरला (फोन नं. ०२१६२ -२३६१५१) एस पी एम एम एस कडून दिली जाईल.
५. एस पी एम एम एस यांच्याकडून संगणक व संगणक साहित्य दुरुस्तीसाठीची माहिती (कॉल) के.आय.आय.टी. यांच्या कॉल सेंटरला कळविल्यानंतर सदर संगणक व संगणक साहित्य ४८ तासाच्या आत के.आय.आय.टी. यांना दुरुस्त करुन द्यावे लागेल.
६. एस पी एम एम एस मधील संगणकामध्ये जे सॉफ्टवेअर इन्स्टॉल करावयाची आहेत ती सर्व सॉफ्टवेअर एस पी एम एम एस यांच्याकडून के.आय.आय.टी. यांना दिली जातील. व सदर सॉफ्टवेअर के.आय.आय.टी. यांच्या हार्डवेअर इंजिनिअर यांच्याकडून संगणकामध्ये इन्स्टॉल केली जातील.
७. एस पी एम एम एस मधील एखादा संगणक पूर्णपणे Format करावयाचा असेल तर अगोदर सदर संगणकामधील डेटाबॅकप ( Data back) बाबतची माहिती के.आय.आय.टी. यांच्या हार्डवेअर इंजिनिअर यांना द्यावी लागेल.
८. एखाद्या संगणक वरती ॲन्टीव्हायरस इन्स्टॉल करावयाचा असल्यास तो एस पी एम एम एस यांच्याकडून खरेदी करुन द्यावा लागेल.
९. एस पी एम एम एस एसमधील ज्या संगणकामधील साहित्य किंवा इतर साहित्य नादुरुस्त झाले असेल आणि ते जर का दुरुस्त होत नसेल किंवा कालबाह्य झाले असेल असे साहित्य एस पी एम एम एस यांना नवीन खरेदी करुन द्यावे लागेल.
१०. एस पी एम एम एस मधील संगणक, संगणक साहित्य किंवा एखादा पार्ट प्रत्यक्ष ठिकाणी दुरुस्त होत नसल्यास सदर साहित्य दुरुस्तीसाठी के.आय.आय.टी. येथे नेण्याची परवानगी एस पी एम एम एस यांच्याकडून दिली जाईल.
११. एस पी एम एम एस मधील जे संगणक व संगणक साहित्य वॉरंटी कालावधी मधील असेल व ते नादुरूस्त असेल. तर सदर साहित्य दुरूस्त करून देण्याची जबाबदारी ही पूर्णपणे साहित्य खरेदी केलेल्या डिलरची असेल.
१२. एस पी एम एम एस मधील कोणतेही नादुरूस्त संगणक व संगणक साहित्य दुरुस्तीसाठी के.आय.आय.टी. येथे दिल्यानंतर सदर साहित्य दुरुस्तीसाठीचा खर्च एस पी एम एम एस यांना द्यावा लागेल.
१३. एस पी एम एम एस मधील संगणक व संगणक साहित्य वापराबावत तसेच दुरूस्तीबाबतची माहिती एस पी एम एम एस मधील सेवकांना, विभागप्रमुखांना पाहिजे असल्यास सदर माहिती के.आय.आय.टी. मार्फत काम करीत असलेल्या हार्डवेअर इंजिनिअर यांनी दुरूस्तीबाबतची माहिती सदर सेवकांना व विभागप्रमुखांना द्यावी लागेल.
१४. एस पी एम एम एस मधील ज्या विभागातील नादुरुस्त संगणक व संगणक साहित्य के.आय.आय.टी. मार्फत दुरुस्ती करुन दिले जाईल त्या विभागप्रमुखांनी साहित्य दुरुस्ती करुन मिळाल्या बावत के.आय.आय.टी. यांच्या कॉल रिपोर्ट वरती संगणक व संगणक साहित्य

SAVITRIBAI PHULE MAHILA MAHAVIDYALAYA SATARA
Institute of Information Technology Estd.1998 Satara

दुरूस्ती तपशील, विभागाचे नाव, विभागप्रमुखांचे नाव, सही व तारीख इत्यादी माहिती द्यावी लागेल.

१५. के.आय.आय.टी. मार्फत दुरुस्त केलेल्या संगणक व संगणक साहित्याची माहिती एस पी एम एम एस मधील संगणक विभाग प्रमुख तसेच ऑफिसप्रमुख (OS) यांना के.आय.आय.टी. मार्फत द्यावी लागेल.

१६. एस पी एम एम एस मधील सर्व संगणक व संगणक साहित्य दुरुस्तीचे बील मंजूर दरपत्रकानुसार के.आय.आय.टी. यांनी प्राचार्य, एस पी एम एम एस एसयांच्या नावे दिल्यानंतर एस पी एम एम एस मार्फत सदर बिलाचा चेक मा. संचालक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, सातारा यांच्या नावे के. आय. आय. टी, यांना देण्यात येईल.

१७. सदर करारासंबंधीच्या तक्रारबाबतची न्यायालयीन कार्यक्षेत्र मे. सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हिजन, सातारा यांच्या कक्षेत राहील.

१८. सदरचा करार हा करार लिहून देणार व लिहून घेणार यांचेवर तसेच त्यांचा वालीवारस यांचेवर बंधनकारक आहे.

१९. सदर करारामध्ये नमूद केलेल्या नियम व अटीबाबत सर्व अधिकार प्राचार्य, एस पी एम एम एस यांनी राखून ठेवले आहेत. हे के.आय.आय.टी. यांना मान्य आहे.

वरील सर्व नियम व अटी यामध्ये कोणत्याही प्रकारे दोन्हीकडून भंग झाल्यास व नमूद केलेल्या कारवाईस व इतर कायदेशीर बाबीस आम्ही के.आय.आय.टी. व एस पी एम एम एस पात्र आहोत.

**के आय आय टी, सातारा यांची संपर्कासाठीची माहिती -**

१. संपर्क व्यक्तीचे नाव - श्री संतोष भोसले (हार्डवेअर इंजिनिअर)
२. ई-मेल str.karmveer@gmail.com
३. मोबाईल नंबर -९८६७४९२८४४,९८२२०७६२६७
४. फोन नंबर - (०२१६२-२३६१५१,१३७९७६)
५. ऑनलाईन कॉल नोंदविण्यासाठी - www.kiitsatara.blogspot.in

**एस पी एम एम एस यांची संपर्कासाठीची माहिती -**

१) सौ. अर्चना कदम - ८२०८९९३६३७ - archukdm@gmail.com
२) श्री प्रदिप गायकवाड - ९९२२४९५९८२ - pradeep१२j@gmail.com
३) श्री श्रीमंत निकम - ९८९०५५९४६४ - shreenikam४२@gmail.com
४) श्री सचिन अलकुंटे -९४२३२७१५२४
५) ईमेल - savitribai_phule@yahoo.com

SAVITRIBAI PHULE MAHILA MAHAVIDYALAYA SATARA

K.B.P. Institute of Information Technology Estd.1998 Satara

येणेप्रमाणे करारात असे.

सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.
(एस पी एम एम एस)
तर्फे

लिहून घेणार

प्रि. डॉ. आंधळे ए. डी.
प्राचार्य,
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.

डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, सातारा
(के.आय.आय.टी.)
तर्फे

लिहून देणार

श्री सूर्यकांत पोरे
समन्वयक,
के.आय.आय.टी, सातारा

साक्षीदार -

१ -

२ - शिंदे पी. आर.

ठिकाण - सातारा

दिनांक - 23/08/2019

**सोबत :- के आय आय टी सातारा यांचे संगणक व संगणक साहित्य दुरूस्ती मंजूर दरपत्रक.**

के आय आय टी सातारा यांचे संगणक व संगणक साहित्य दुरूस्ती मंजूर दरपत्रक.

| अ.नं. | कामाचा तपशिल | दर (प्रति) |
|---|---|---|
| १ | संगणक फॉरमॅट (Format) करणे आणि ओएस व एमएस ऑफिस इंन्स्टॉल करणे | २००/- |
| २ | ऑपरेटिंग सिस्टीम इंन्स्टॉल करणे | ५०/- |
| ३ | एम एस ऑफिस इंन्स्टॉल करणे | ५०/- |
| ४ | ओपन सोर्स (Open source) सॉफ्टवेअर इंन्स्टॉल करणे (ओएस) | १००/- |
| ५ | डेटाबेस सॉफ्टवेअर इंन्स्टॉल करणे | ७५/ |
| ६ | संगणक (CPU) चेक करणे व प्रॉब्लेम सांगणे | ५०/- |
| ७ | नेटवर्क चेक करणे व कनेक्टर बसविणे | ५०/- |
| ८ | प्रिंटर, स्कॅनर इंन्स्टॉल करणे | ५०/- |
| ९ | एलसीडी प्रोजेक्टर व लॅपटॅप चेक करणे (दुरूस्ती संदर्भात) | ५०/- |
| १० | ॲन्टी व्हायरस सॉफ्टवेअर इंन्स्टॉल करणे | ५०/- |
| ११ | इंटरनेट कनेक्शन चेक करणे | ५०/- |
| १२ | ॲन्टी व्हायरस सॉफ्टवेअर अपडेट करणे व व्हायरस चेक करणे | ५०/- |
| १३ | संगणक व संगणक साहित्य दुरूती - साहित्य दुरूस्तीसाठी होणा-या खर्चानुसार दर राहतील. (उदा - SPMS, Motherboard, Monitor, Printer, Hard Disk, LCD Projector. Laptop etc) | |
| १४ | | |
| १५ | | |

SAVITRIBAI PHULE MAHILA MAHAVIDYALAYA SATARA

KBP Institute of Information Technology Estd. 1998 Satara